मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राज्यशास्त्र विभाग यांच्यावतीने आयोजित संविधान जागृती फेरीच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान जागृती फेरीला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे पोस्टर आणि बॅनर हाती घेऊन गेवराई शहरातून संविधान जागृती फेरी काढली. विविध ठिकाणी संविधान प्रेमी नागरिकांनी संविधान फेरीला शुभेच्छा दिल्या. शास्त्री चौक येथे लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. ज्यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. त्यानंतर मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संविधान जागृती कार्यक्रमात डॉ. समाधान इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्धेश्वर सटाले यांनी केले, तर मराठी विभागातील प्रा. शरद सदाफुले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. रेवणनाथ काळे, डॉ. सुदर्शना बढे, डॉ. सचिन पगारे. डॉ. संदीप वंजारी, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. राहुल माने, प्रा.डी.पी मंचरे, प्रा.दिपक डोंगरे, प्रा.शिंगाडे, प्रा.उदय खरात, प्रा.सचिन खरात, प्रा.वाघ मॅडम आदींची उपस्थिती होती. प्राध्यापक डोंगरे यांनी आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.


दैनिक लोकाशा
महाराष्ट्राच्या मनाचा नकाशा
26NOV2021

संविधान हे जगण्याचे ध्येय आणि सत्य - समाधान इंगळे
अट्टल महाविद्यालयात संविधान जागृती फेरी व्याख्यान संपन्न

गेवराई, दि.२६ (लोकाशा न्युज):- संविधान हे जगण्यातील ध्येय आणि सत्य यांचे महत्त्वाचे केंद्र आहे. संविधानामुळे असंख्य पिढ्यांचे स्वप्न साकार झाले. मानवतावादी कार्य करणाऱ्या समाजसुधारकांचे, संतांचे, विचारवंतांचे, राज्यकर्त्यांचे संविधानामुळे उद्दिष्ट सफल झाले. तथागत गौतम बुद्धांपासून ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत सर्वच सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, क्रांत्यांचे आणि आंदोलनांचे फलस्वरूप म्हणजे भारतीय संविधान होय. ज्याप्रमाणे आपण प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन साजरा करतो त्याप्रमाणेच संविधान दिनही मोठ्या प्रमाणावर साजरा केला पाहिजे. नाहीतर नव्या पिढीला संविधान, संविधानाची उद्देशिका, संविधानातील कर्तव्य आणि जबाबदारी यांचे भान राहणार नाही' असे मत समाधान इंगळे यांनी व्यक्त केले.
मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना आणि राज्यशास्त्र विभाग यांच्यावतीने आयोजित संविधान जागृती फेरीच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली संविधान जागृती फेरीला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे पोस्टर आणि बॅनर हाती घेऊन गेवराई शहरातून संविधान जागृती फेरी काढली. विविध ठिकाणी संविधान प्रेमी नागरिकांनी संविधान फेरीला शुभेच्छा दिल्या. शास्त्री चौक येथे लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला अभिवादन करून भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन केले. ज्यामध्ये विद्यार्थी, प्राध्यापक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होते. त्यानंतर मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप बनसोडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या संविधान जागृती कार्यक्रमात डॉ. समाधान इंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्धेश्वर सटाले यांनी केले. तर मराठी विभागातील प्रा. शरद सदाफुले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. रेवणनाथ काळे, डॉ.सुदर्शना बढे, डॉ.सचिन पगारे. डॉ.संदीप वंजारी, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा.राहुल माने, प्रा.डी.पी मंचरे, प्रा.दिपक डोंगरे, प्रा.शिंगाडे, प्रा.उदय खरात, प्रा.सचिन खरात, प्रा.वाघ मॅडम आदींची उपस्थिती होती. प्राध्यापक डोंगरे यांनी आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.





# अट्टल महाविद्यालयात ३ रे कोविड लसीकरण शिबिर

१६ डिसेंबर २०२१

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे तिसरे कोविड लसीकरण शिबिर संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर शंभर टक्के कोविड लसीकरण करण्याच्या मोहिमेत महाविद्यालयातील तिसरे लसीकरण शिबिर घेण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील आरोग्य कर्मचारी डॉ. मिसाळ, डॉ. आंधळे, श्रीमती वसावे, श्रीमती गर्जे आणि सहकारी शिक्षक मंडळींनी या शिबिरात सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे.

नियमित तासिका आणि परीक्षांच्या पार्श्वभूमीवर हे लसीकरण विद्यार्थ्यांसाठी बंधन कारक होते. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या माध्यमातून हे शिबिर राबविण्यात आले. या शिबिरासाठी उपप्राचार्य डॉ. मेजर विजय सांगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, प्रशासकीय कर्मचारी किसन सागडे यांनी परिश्रम घेतले. त्यासोबतच डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांनी पुढाकार घेऊन लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून शिबिर यशस्वी केले.

*फोटो आणि संबंधित बातमी*





लोकमत

शिबिरातून केले शंभर टक्के लसीकरणाचे उद्दिष्ट पूर्ण

गेवराईतील र.भ. अट्टल महाविद्यालयात १०० टक्के कोविड लसीकरण पूर्ण करण्यासाठी तिसरे शिबीर घेण्यात आले.

## अट्टल महाविद्यालयात लसीकरण पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**गेवराई :** र. भ. अट्टल महाविद्यालय येथे कोविड प्रतिबंधक लसीकरणासाठी तिसरे शिबिर घेण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर १०० टक्के कोविड लसीकरण करण्याच्या मोहिमेत महाविद्यालयात हे शिबिर घेण्यात आले. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे.

उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य कर्मचारी डॉ. मिसाळ, डॉ.आंधळे, वसावे, गर्जे आणि सहकारी शिक्षकांनी या शिबिरात सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे. नियमित तासिका आणि परीक्षांच्या पार्श्वभूमीवर हे लसीकरण विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक होते. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या माध्यमातून हे शिबिर राबविण्यात आले. या शिबिरासाठी उपप्राचार्य डॉ. मेजर विजय सांगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, प्रशासकीय कर्मचारी किसन सागडे यांनी परिश्रम घेतले. डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी पुढाकार घेऊन लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून शिबिर यशस्वी केले.

Hello Beed
Page No. 4 Dec 18, 2021
Powered by: erelego.com



दिव्य लोकप्रभा
Sat 18-12-2021
Page No. 3

## गेवराई येथील अट्टल महाविद्यालयात तिसरे कोविड लसीकरण शिबिर संपन्न

**काझी अमान । गेवराई**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई येथे तिसरे कोविड लसीकरण शिबिर संपन्न झाले. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महाविद्यालयीन स्तरावर शंभर टक्के कोविड लसीकरण करण्याच्या मोहिमेत महाविद्यालयातील तिसरे लसीकरण शिबिर घेण्यात आले.

उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील आरोग्य कर्मचारी डॉ. मिसाळ, डॉ. आंधळे, श्रीमती वसावे, श्रीमती गर्जे आणि सहकारी शिक्षक मंडळींनी या शिबिरात सहभाग नोंदवला. महाविद्यालयातील १८ वर्षे वयावरील संपूर्ण विद्यार्थ्यांचे तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे लसीकरण करण्यास महाविद्यालय यशस्वी झाले आहे. नियमित तासिका आणि परीक्षांच्या पार्श्वभूमीवर हे लसीकरण विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक होते. प्राचार्या डॉ. रजनीताई शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागांच्या माध्यमातून हे शिबिर राबविण्यात आले. या शिबिरासाठी उपप्राचार्य डॉ. मेजर विजय सांगळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, प्रशासकीय कर्मचारी किसन सागडे यांनी परिश्रम घेतले. त्यासोबतच डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, राष्ट्रीय छात्र सेना व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांनी पुढाकार घेऊन लसीकरण न झालेल्या विद्यार्थ्यांना एकत्रित करून शिबिर यशस्वी केले.

# राष्ट्रीय बालिका दिन

२४ जानेवारी २०२२

'असुरक्षितता आणि अनिश्चितता या दोन गोष्टींमुळे अनाथांचे आयुष्य कमालीचे अडचणीत आहे. अशा मुलांचे भरण-पोषण करून केवळ शारीरिक विकासच फक्त साधला जाऊ नये, तर अशा विद्यार्थ्यांना स्पर्शाची जास्त गरज आहे. अन्नदान आणि आर्थिकदान याप्रमाणेच स्पर्शदान ही बाब या अनाथ चिमुकल्यांसाठी आवश्यक आहे. देशासाठी चांगले नागरिक घडविताना आपल्या सर्वांची ही जबाबदारी आहे. अशा मुलांशी चर्चा केल्यानंतर त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर जगण्याची नवी उमेद प्राप्त होते. अनाथ बालिकांचे संगोपन ही त्यातल्यात्यात एक मोठी जबाबदारी आहे. या संपूर्ण जबाबदाऱ्या पूर्ण करताना आम्हाला सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना समाजातील जाणकारांची जास्त आवश्यकता आहे' असे मत समाजसेवक संतोष गर्जे यांनी व्यक्त केले. राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्याहस्ते असंख्य अनाथ बालिकांचे पालक म्हणून प्रीती गरजे आणि संतोष गर्जे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला कक्ष अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी सत्कारास उत्तर देताना प्रीती गर्जे आणि संतोष गर्जे यांनी आपले अनाथालयाशी संबंधित कार्यानुभव उपस्थितांना सांगितले. हे अनुभव ऐकताना उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या. अनेक हृदयद्रावक घटनांची माहिती संतोष गर्जे यांनी दिली. सद्यस्थितीमध्ये देशातील नागरिक या नात्याने सर्वांच्या जबाबदारीचे भान त्यांनी लक्षात आणून दिले.

यावेळी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, अंतर्गत तक्रार निवारण आणि महिला कक्ष प्रमुख डॉ. सुदर्शना बढे यांच्यासह प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. डॉ. व्ही. एम. जयसिंगपुरे यांनी प्रास्ताविक केले, समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले. सदरील कार्यक्रम महाविद्यालयाच्या फेसबुक पेज वरूनही प्रक्षेपित करण्यात आला.

*फोटो आणि संबंधित बातमी*










दिव्य मराठी बीड जिल्हा 25-01-2022

## अनाथांना गोंजारणारे, मायेची ऊब देणारे हात गरजेचे : गर्जे

प्रतिनिधी । गेवराई

'असुरक्षितता आणि अनिश्चितता या दोन गोष्टींमुळे अनाथांचे आयुष्य कमालीचे अडचणीत आले आहे. अशा मुलांचे भरण-पोषण करून केवळ शारीरिक विकासच फक्त साधला जाऊ नये तर अशा विद्यार्थ्यांना स्पर्शाची जास्त गरज आहे. अन्नदान आणि आर्थिकदान याप्रमाणेच स्पर्शदान ही बाब या अनाथ चिमुकल्यांसाठी आवश्यक आहे. या चिमुकल्यांशी संवाद साधल्यानंतर जगण्याची नवी उमेद प्राप्त होते. त्यामुळे अनाथांना गोंजारणारे, मायेची ऊब देणारे हात गरजेचे आहेत, अशी अपेक्षा सहारा अनाथालयाचे संचालक संतोष गर्जे यांनी व्यक्त केली.

राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयात प्राचार्य डॉ.रजनी शिखरे यांच्या हस्ते अनाथ बालिकांचे पालक म्हणून प्रीती गर्जे आणि संतोष गर्जे यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना विभाग, महिला कक्ष अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सत्कारास उत्तर देताना प्रीती गर्जे आणि संतोष गर्जे यांनी आपले अनाथालयाशी संबंधित कार्यानुभव उपस्थितांना सांगितले. हे अनुभव ऐकताना उपस्थितांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या. अनेक हृदयद्रावक घटनांची माहिती संतोष गर्जे यांनी दिली. सद्यःस्थितीत देशातील नागरिक या नात्याने सर्वांच्या जबाबदारीचे भान त्यांनी लक्षात आणून दिले. यावेळी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी उपस्थित होते. डॉ. व्ही. एम. जयसिंगपुरे यांनी प्रास्ताविक केले. समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन केले तर डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले.

गेवराईत र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार

राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त र. भ. अट्टल महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलताना संतोष गर्जे

**विविध घटकांच्या मदतीने काम स्वयंपूर्ण**

देशासाठी चांगले नागरिक घडवताना अनाथांशी सु संवाद ठेवणे आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. अशा मुलांशी चर्चा केल्यानंतर त्यांच्याशी संवाद साधल्यानंतर जगण्याची नवी उमेद प्राप्त होते. अनाथ बालिकांचे संगोपन ही तर अधिक मोठी जबाबदारी आहे. या संपूर्ण जबाबदाऱ्या पूर्ण करताना सामाजिक क्षेत्रात कार्यरत कार्यकर्त्यांची मदत, मार्गदर्शन झाल्यास काम स्वयंपूर्ण होते, असे संतोष गर्जे यांनी सांगितले.

# रक्तदान शिबिर आणि मतदान दिन

२५ जानेवारी २०२२

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वदिनी राष्ट्रीय मतदान दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्याहस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. तत्पूर्वी राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी समाधान इंगळे यांनी मतदान जागृतीची शपथ देऊन मतदान विषयक जाणीव जागृती निर्माण करणारे मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, प्रा. राहुल माने आदींची उपस्थिती होती. यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाचे रक्तपेढी तंत्रज्ञ नितीन सोळुंके, अमोल हावळे, रक्तपेढी परिचर दिलीप अवसरमल यांनी रक्त संकलनाचे कार्य केले.

या शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. प्रा शरद सदाफुले, प्रा. बाळासाहेब जोगदंड, प्रा. उदय खरात, प्रा. युवराज कठाळे, वसतीगृह अधिक्षक श्रीमती ज्योती खरात, श्रीमती प्रणाली निंबुळकर, राष्ट्रीय छात्र सेना सिनिअर अंडर ऑफिसर ऋषिकेश गोरे, उमेश मेत्रे, अजय मोटे, महेश बोराडे, विशाल बांगर, सौरभ साखरे, श्रीकांत गवारे, सागर देवकते, रोहित काळे आदींनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या संकल्पनेतून अट्टल महाविद्यालयात वर्षातून दोन वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दोन राष्ट्रीय सणांचे औचित्य साधून रक्तदान शिबिर संपन्न होते. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शासनाने घालून दिलेले सर्व कोविडचे नियम पाळून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट यांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालय बंद असताना आणि वातावरणातील बदल लक्षात घेता रक्तदान शिबिरासाठी मिळालेला प्रतिसाद खूप चांगला असल्याचे मत संयोजकांनी व्यक्त केले.

*फोटो आणि संबंधित बातमी*









दिव्य लोकप्रभा
Fri 28-01-2022
Page No. 3

## अट्टल महाविद्यालयात रक्तदान शिबिर आणि मतदान दिन संपन्न

गेवराई । काझी अमान

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई येथे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वदिनी राष्ट्रीय मतदान दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्याहस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. तत्पूर्वी राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी समाधान इंगळे यांनी मतदान जागृतीची शपथ देऊन मतदान विषयक जाणीव जागृती निर्माण करणारे मार्गदर्शन केले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, प्रा. राहुल माने आदींची उपस्थिती होती. यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाचे रक्तपेढी तंत्रज्ञ नितीन सोळुंके, अमोल हावळे, रक्तपेढी परिचर दिलीप अवसरमल यांनी रक्त संकलनाचे कार्य केले. या शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. प्रा शरद सदाफुले, प्रा. बाळासाहेब जोगदंड, प्रा. उदय खरात, प्रा. युवराज कठाळे, वसतीगृह अधिक्षक श्रीमती ज्योती खरात, श्रीमती प्रणाली निंबुळकर, राष्ट्रीय छात्र सेना सिनिअर अंडर ऑफिसर ऋषिकेश गोरे, उमेश मेत्रे, अजय मोटे, महेश बोराडे, विशाल बांगर, सौरभ साखरे, श्रीकांत गवारे, सागर देवकते, रोहित काळे आदींनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या संकल्पनेतून अट्टल महाविद्यालयात वर्षातून दोन वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दोन राष्ट्रीय सणांचे औचित्य साधून रक्तदान शिबिर संपन्न होते. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शासनाने घालून दिलेले सर्व कोविडचे नियम पाळून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट यांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालय बंद असताना आणि वातावरणातील बदल लक्षात घेता रक्तदान शिबिरासाठी मिळालेला प्रतिसाद खूप चांगला असल्याचे मत संयोजकांनी व्यक्त केले.



सुवर्ण महाराष्ट्र

होम महत्वाच्या बातम्या महाराष्ट्र देश विदेश खेळ

by सुवर्ण महाराष्ट्र — January 25, 2022

0 SHARES

## राष्ट्रीय मतदान दिनाच्या निमित्ताने र.भ.अट्टल महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न

प्रतिनिधी सोमनाथ मोटे बीड/गेवराई

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्या लय, गेवराई येथे प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वदिनी राष्ट्रीय मतदान दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले.

प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्याहस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन संपन्न झाले. तत्पूर्वी राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना कार्य क्रमाधिकारी समाधान इंगळे यांनी मतदानजागृ तीची शपथ देऊन मतदान विषयक जाणी व जागृती निर्माण करणारे मार्गदर्शन केले.या प्रसंगी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे,उप प्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, पर्यवेक्षक प्रा. चंद्रकांत पुरी, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुदर्शना बढे, प्रा. रेवणनाथ काळे, प्रा. राहुल माने आदींची उपस्थिती होती. यावेळी बीड जिल्हा रुग्णालयाचे रक्तपेढी तंत्रज्ञ नितीन सोळुंके, अमोल हावळे, रक्तपेढी परिचर दिलीप अवसरमल यांनी रक्त संकलनाचे कार्य केले.

या शिबिरात २१ रक्तदात्यांनी रक्तदान करून प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. प्रा शरद सदाफुले, प्रा. बाळासाहेब जोगदंड, प्रा. उदय खरात, प्रा. युवराज कठाळे, वसतीगृह अधिक्षक श्रीमती ज्योती खरात, श्रीमती प्रणाली निंबुळकर, राष्ट्रीय छात्र सेना सिनिअर अंडर ऑफिसर ऋषिकेश गोरे, उमेश मेत्रे, अजय मोटे, महेश बोराडे, विशाल बांगर, सौरभ साखरे, श्रीकांत गवारे, सागर देवकते, रोहित काळे आदींनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या संकल्पनेतून अट्टल महाविद्यालयात वर्षातून दोन वेळा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिन या दोन राष्ट्रीय सणांचे औचित्य साधून रक्तदान शिबिर संपन्न होते.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शासनाने घालून दिलेले सर्व कोविडचे नियम पाळून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आणि राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट यांनी सहभाग नोंदवला. महाविद्यालय बंद असताना आणि वातावरणातील बदल लक्षात घेता रक्तदान शिबिरासाठी मिळालेला प्रतिसाद खूप चांगला असल्याचे मत संयोजकांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय पल्स – पोलिओ लसीकरण कार्यक्रम

२७ फेब्रुवारी २०२२

राष्ट्रीय पल्स – पोलिओ लसीकरण कार्यक्रम अंतर्गत उपजिल्हा रुग्णालयाच्या सहकार्यासाठी रासेयो विभागातील 30 स्वयंसेवक यांनी सक्रीय सहभाग नोंदवला. तसेच काही स्वयंसेवक राष्ट्रीय पल्स – पोलिओ लसीकरण कार्यक्रम अंतर्गत आठवडाभर सहभागी होऊन कार्य केले.

फोटो









# राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर

११ ते १७ मार्च २०२२

मौजे रेवकी-देवकी, ता.गेवराई, जि.बीड

## सस्नेह निमंत्रण...

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,

र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड

आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## सात दिवसीय विशेष निवासी शिबीर

शुक्रवार, दि. ११ ते गुरुवार, दि. १७ मार्च २०२२

ठिकाण : रेवकी -देवकी, ता. गेवराई, जि. बीड

प्रति, ______________________

______________________

कृपया आपण उपस्थित राहावे, ही विनंती.

**विनीत**

श्री.विजयकुमार मस्के (ग्रामसेवक, रेवकी)

श्रीमती जनाबाई चोरमले (सरपंच : रेवकी-देवकी)

प्रोफेसर रजनी शिखरे (प्राचार्य, र.भ.अट्टल महाविद्यालय)

**राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी**

डॉ. समाधान इंगळे, डॉ. वृषाली गव्हाणे, प्रा. चंद्रकांत पुरी

डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, प्रा. शरद सदाफुले

**राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी**

रेवती सुतार, राहुल गायकवाड

**सहकार्य**

समस्त गावकरी मंडळी, ग्रामपंचायत सदस्य, रेवकी सर्व शिक्षकवृंद, मुख्याध्यापक, जि. प. शाळा, सर्व प्राध्यापकवृंद, कर्मचारी, विद्यार्थी, र. भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई

---

**सांस्कृतिक कार्यक्रम** | शुक्रवार, दि. ११ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

ह.भ.प.अशोक महाराज व्हरकटे यांचे कीर्तन

गावकरी भजनी मंडळ, रेवकी - देवकी

### उद्घाटन समारंभ

शनिवार, दि. १२ मार्च २०२२ ♦ सकाळी १०.३० वा.

: उद्घाटक : मा.डॉ.आनंद देशमुख

(संचालक, रा.से.यो., डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद)

अध्यक्ष : मा.श्री.जालिंदर पिसाळ

(निमंत्रित सदस्य महाविद्यालय विकास समिती, अट्टल महाविद्यालय

: प्रमुख उपस्थिती :

मा.श्री.दीपक आतकरे (सदस्य, महाविद्यालय विकास समिती, अट्टल महाविद्यालय)

ॲड.आनंद सुतार (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती, अट्टल महाविद्यालय)

मा.श्री.संदीप काळे (पोलीस उपनिरीक्षक, गेवराई)

श्री.बाळाभाऊ पिंपळे (केंद्रीय मुख्याध्यापक, जि. प. शाळा, रेवकी),

**सांस्कृतिक कार्यक्रम** | शनिवार, दि. १२ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

'या मातीचे शब्द-रंग'

: सादरकर्ते :

सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर

चित्रकार प्रतिक विजया शरद सदाफुले

**शिवार फेरी** | रविवार, दि. १३ मार्च २०२२ ♦ दुपारी १ वा.

मार्ददर्शक : मा. श्री. रामभाऊ देवकते

**सांस्कृतिक कार्यक्रम** | रविवार, दि. १३ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

'व्याख्यान'

विषय : ग्रामविकासात युवकांची भूमिका

: वक्ते :

मा.श्री.गणेश सावंत

(माजी सरपंच, रांजणी तथा उपसंपादक, दिव्य मराठी, बीड)

---

**बौद्धिक सत्र** | सोमवार, दि. १४ मार्च २०२२ ♦ दुपारी १ वा.

आयोजक : महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती

विषय : महिलांचे आरोग्य

मार्गदर्शक : डॉ. रचना शेळके - मोटे    अध्यक्ष : श्रीमती वर्षा महामुनी

**सांस्कृतिक कार्यक्रम** | सोमवार, दि. १४ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

'व्याख्यान'

विषय : विज्ञान आणि आजची तरूणाई

वक्ते : मा.श्री.धर्मराज करपे (सुप्रसिद्ध वक्ते)

विशेष संदर्भ : अल्बर्ट आईनस्टईन

**बौद्धिक सत्र** | मंगळवार, दि. १५ मार्च २०२२ ♦ दुपारी १ वा.

विषय : सेंद्रीय शेती आणि प्रमाणीकरण

मार्गदर्शक : डॉ. प्रशांत पांगरीकर (वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख)

**सांस्कृतिक कार्यक्रम** | मंगळवार, दि. १५ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी यांचा सांस्कृतिक कार्यक्रम

**बौद्धिक सत्र** | बुधवार, दि. १६ मार्च २०२२ ♦ दुपारी १ वा.

विषय : पाणी परिक्षण

मार्गदर्शक : डॉ. सुनील भगत (रसायनशास्त्र विभाग प्रमुख)

**सांस्कृतिक कार्यक्रम** | बुधवार, दि. १६ मार्च २०२२ ♦ रात्री ७ वा.

क्रांतीकारी गीतांचा कार्यक्रम

सादरकर्ते : नभा, उमेश. अमरजीत, समाधान इंगळे परिवार

प्रमुख उपस्थिती : डॉ. संदीप बनसोडे (सांस्कृतिक विभाग प्रमुख)

### समारोप समारंभ

गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ ♦ सकाळी १०.३० वा.

अध्यक्ष : मा.श्री.अमरसिंह पंडित (उपाध्यक्ष, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद)

: प्रमुख उपस्थिती :

मा.ॲड.एच.एस.पाटील (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)

मा.श्री.भगवान मोटे (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)

मा.श्री.सचिन सानप, (गट विकास अधिकारी, गेवराई)

डॉ.पंडित खाकरे (जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, बीड)

---

: शिबिर सल्लागार समिती :

मेजर विजय सांगळे (उपप्राचार्य)

डॉ.प्रशांत पांगरीकर (उपप्राचार्य)

डॉ.प्रवीण सोनुने (आयक्यूएसी समन्वयक)

प्रा.राजेंद्र राऊत (उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय)

श्री.बप्पासाहेब पिंपळे (प्रबंधक)

श्री.भागवत गवंडी (कार्यालयीन अधीक्षक)

### साप्ताहिक कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| सकाळी ६ ते ७ | : | योगा - व्यायाम<br>पतंजली योग समिती, गेवराई यांच्या मार्गदर्शनाखाली |
| सकाळी ७ ते ८:३० | : | ग्राम सफाई प्रभात फेरी |
| सकाळी ८:३० ते ९ | : | अल्पोपाहार |
| सकाळी ९ ते १२ | : | श्रमदान |
| दुपारी १२ ते १ | : | भोजन |
| दुपारी १ ते ३ | : | बौद्धिक सत्र |
| दुपारी ३ ते ४ | : | विश्रांती |
| दुपारी ४ ते ५ | : | विविध खेळ |
| सायंकाळी ५ ते ६ | : | गटचर्चा |
| सायंकाळी ६ ते ७ | : | भोजन |
| रात्री ७ ते १० | : | सांस्कृतिक कार्यक्रम |

### शिबिर ध्येय

व्यक्तित्व विकास * नेतृत्व गुण विकास

व्यवसायाभिमुख कौशल्य विकास * पर्यावरण संवर्धन

जल संवर्धन * वृक्षारोपण आणि संवर्धन

ग्राम स्वच्छता अभियान * महिला सक्षमीकरण

आरोग्य जागृती * सांस्कृतिक कला गुण विकास

अंधश्रद्धा निर्मूलन * समाज उद्बोधन - प्रबोधन

ग्राम संस्कृती संवर्धन * साहित्य अभिरुची

दिव्य लोकप्रभा
Sat 12-03-2022
Page No. 6

# अट्टल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरास रेवकी येथे सुरुवात

## आदर्श शिक्षक मधुकर बैरागी यांच्या नावाने उभारला स्मृतीमंच

**गेवराई । काझी अमान**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबीर मौजे रेवकी - देवकी, ता. गेवराई, जि. बीड येथे शुक्रवार, दि. ११ ते गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ दरम्यान होत आहे. या शिबिरास आज सुरुवात झाली आहे.प्रोफेसर रजनी शिखरे (प्राचार्य, र.भ.अट्टल महाविद्यालय) श्रीमती जनाबाई चोरमले (सरपंच, रेवकी - देवकी) विजयकुमार मस्के (ग्रामसेवक, रेवकी) राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. अमोल शिरसाट, प्रा. चंद्रकांत पुरी, प्रा. शरद सदाफुले, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी रेवती सुतार, राहुल गायकवाड हे शिबिराचे निमंत्रक असून गावकरी मंडळी, ग्रामपंचायत सदस्य, सर्व शिक्षक, मुख्याध्यापक, जि. प. शाळा, रेवकी, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, र. भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई यांचे मोलाचे सहकार्य या शिबिरास लाभत आहे. शुक्रवार, दि. ११ मार्च रोजी रात्री ७ वाजता ह. भ. प. अशोक महाराज व्हरकटे यांचे कीर्तन संपन्न झाले.शनिवार, दि. १२ मार्च रोजी सकाळी १०.३० वाजता उद्घाटन समारंभ होणार असून उद्घाटक म्हणून डॉ. आनंद देशमुख (संचालक, रा.से.यो., डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद) हे उपस्थित राहणार आहेत. या समारंभाचे अध्यक्षस्थान जालिंदर पिसाळ (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती, अट्टल महाविद्यालय) हे भूषविणार असून दीपक आतकरे (सदस्य, महाविद्यालय विकास समिती, अट्टल महाविद्यालय), ॲड. आनंद सुतार (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती), संदीप काळे (पोलीस उपनिरीक्षक, गेवराई), बाळाभाऊ पिंपळे (केंद्रीय मुख्याध्यापक, जि. प. शाळा, रेवकी) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रात्री ७ वा. या मातीचे शब्द - रंग या शीर्षकाखाली रेवकी मूळ गाव असणाऱ्या सुप्रसिद्ध कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांच्या कवितांचे सादरीकरण होणार आहे. रेवकी येथील चित्रकार प्रतिक विजया शरद सदाफुले ह्याच्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. रविवारी दि. १३ मार्च रोजी दुपारी १ वा. रेवकी शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले असून प्रगतिशील शेतकरी रामभाऊ देवकते हे विद्यार्थ्यांना शिवाराविषयी माहिती देणार आहेत. रात्री ७ वा. ग्रामविकासात युवकांची भूमिका या विषयावर गणेश सावंत (माजी सरपंच, रांजणी तथा उपसंपादक, दिव्य मराठी, बीड) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सोमवारी दि. १४ मार्च रोजी दुपारी १ वा. बौद्धिक सत्रात महिला कक्ष आणि अंतर्गत तक्रार निवारण समिती द्वारे आयोजित महिलांचे आरोग्य या विषयावर डॉ. रचना शेळके - मोटे या मार्गदर्शन करणार असून वर्षा महामुनी या अध्यक्षस्थानी असतील. रात्री ७ वा. विज्ञान आणि आजची तरुणाई या विषयावर धर्मराज करपे हे अल्बर्ट आईनस्टाईन जयंती निमित्त मार्गदर्शन करणार आहेत. मंगळवारी दि. १५ मार्च रोजी दुपारी १ वा. बौद्धिक सत्र सेंद्रिय शेती आणि प्रमाणीकरण या डॉ. प्रशांत पांगरीकर (वनस्पती विभाग प्रमुख) हे मार्गदर्शन करतील. सांस्कृतिक कार्यक्रमात रात्री ७ वा. शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार, दि. १६ मार्च रोजी दुपारी १ वा. बौद्धिक सत्रात पाणी परीक्षण या विषयावर डॉ. सुनील भगत (रसायनशास्त्र विभाग प्रमुख) हे गावकऱ्यांशी संवाद साधणार असून सांस्कृतिक कार्यक्रमात रात्री ७ वा. कु. नभा, उमेश, अमरजीत आणि समाधान इंगळे परिवार प्रबोधनाचा सांस्कृतिक जलसा सादर करणार आहेत. यावेळी प्रमुख उपस्थिती ही डॉ. संदीप बनसोडे (सांस्कृतिक विभाग प्रमुख, अट्टल महाविद्यालय) यांची राहील. शिबिराचा समारोप समारंभ गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ रोजी सकाळी ११ वा. अमरसिंह पंडित (उपाध्यक्ष, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद) यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून यावेळी ॲड. एच. एस. पाटील (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती), भगवान मोटे(निमंत्रित सदस्य महाविद्यालय विकास समिती), सचिन सानप (गट विकास अधिकारी, गेवराई), डॉ. पंडित खाकरे (जिल्हा समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, बीड) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. शिबिर सल्लागार समितीचे मेजर प्रोफेसर विजय सांगळे (उपप्राचार्य), डॉ. प्रशांत पांगरीकर (उपप्राचार्य), डॉ. प्रवीण सोनुने (आयक्यूएसी समन्वयक), प्रा. राजेंद्र राऊत (उपप्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालय), बप्पासाहेब पिंपळे (प्रबंधक), भागवत गवंडी (कार्यालयीन अधीक्षक) यांचे मार्गदर्शन लाभत असून साप्ताहिक दिनक्रमात सकाळी ६ ते ७ - योगा व व्यायाम शिकवण्यासाठी पतंजली योग समिती, गेवराई येथील योगगुरु मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. सकाळी ७ ते ८:३० - ग्राम सफाई प्रभात फेरी, ९ ते १२ - श्रमदान दुपारी १ ते ३ - बौद्धिक सत्र, ४ ते ५ - विविध खेळ, सायंकाळी ५ ते ६ - गटचर्चा आणि रात्री ७ ते १० - सांस्कृतिक कार्यक्रम असे भरगच्च नियोजन करण्यात आले आहे. व्यक्तित्व विकास, नेतृत्व गुण विकास, व्यवसायाभिमुख कौशल्य विकास, पर्यावरण संवर्धन, जल संवर्धन, वृक्षारोपण आणि संवर्धन, ग्राम स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, आरोग्य जागृती, सांस्कृतिक कला गुण विकास, अंधश्रद्धा निर्मूलन, समाज उद्बोधन - प्रबोधन, ग्राम संस्कृती संवर्धन, साहित्य अभिरुची हे कार्यक्रमाचे ध्येय आणि उद्दिष्ट ठरवले आहे.या शिबिराचा रेवकी - देवकी येथील ग्रामस्थांसह पंचक्रोशीत जनतेने शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन शिबिर संयोजकांनी केले आहे.

## अट्टल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचा पहिला दिवस जाहीर कीर्तन



# अट्टल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन












हलगी पथक आणि लेझीम पथकाने उद्घाटक आणि पाहुण्यांचे स्वागत





रासेयो संचालक डॉ.आनंद देशमुख यांची उपस्थिती.. झाडाला पाणी घालून उद्घाटन संपन्न..







सरपंच संभाजी चोरमले यांचे स्वागत.. प्रास्ताविक करताना प्रा.शरद सदाफुले





उपस्थित जनसमुदाय.. विद्यार्थी.. शिबिरार्थी.. समूह छायाचित्र..

'राष्ट्रीय सेवा योजना हे संस्काराचे विद्यापीठ आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास, व्यक्तिमत्वाचा विकास होत असतानाच ग्रामीण भागातील विविध समस्यांवर विद्यार्थी काम करतात ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. या माध्यमातून विद्यार्थी संविधान मूल्यांची जोपासना करत

असतात. आजही संविधान मूल्य समाजात रुजवण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतून संविधान मूल्य रुजतात हा इतिहास आहे' असे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. आनंद देशमुख यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की 'गेवराई येथील अट्टल महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला निश्चित फायदा झाला आहे. शिक्षकांनी केलेल्या संस्कारामुळेच आज मी इथपर्यंत आलो. आज या शिबिराच्या निमित्ताने रेवकी ग्रामस्थांनी ज्या पद्धतीने माझे स्वागत केले, हे मी आयुष्यभर विसरु शकणार नाही. आपण सर्व मिळून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून रचनात्मक कार्य करूया'. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. आनंद देशमुख र. भ. अट्टल महाविद्यालयाच्या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

आनंद देशमुख हे र. भ. अट्टल महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना संचालकपदी नुकतीच निवड झाली आहे. त्यानिमित्त अट्टल महाविद्यालय आणि रेवती ग्रामस्थांच्या वतीने प्राचार्य प्रोफेसर रजनी शिखरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना आणि उद्घाटनपर मार्गदर्शन करताना विविध विषयांचे संदर्भ देत त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. झाडाला पाणी घालून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभासाठी येणाऱ्या पाहुण्यांचे रेवकी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून लेझीम खेळत स्वागत केले. यावेळी अमोल कांबळे यांच्या हलगी पथकावर सर्वांनीच ठेका धरला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि शिबिराच्या निमंत्रक प्रोफेसर रजनी शिखरे या होत्या. याप्रसंगी सरपंच संभाजी चोरमले, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे, ग्राम विकास अधिकारी विजयकुमार मस्के, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले यांच्यासह रेवकी - देवकी येथील ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, अट्टल महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. सदाफुले यांनी केले. डॉ. राहुल माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर डॉ. अमोल शिरसाट यांनी आभार मानले. मानसी दिसागज या विद्यार्थिनीने स्वागत गीत सादर केले. या शिबीराचा समारोप १७ मार्च रोजी होणार असून तोपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचा गावकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.



Good Evening सिटीझन वार : रविवार पान 3 दिनांक १३ मार्च २०२२

# राष्ट्रीय सेवा योजनेतून संविधान मूल्य रुजतात-डॉ. आनंद देशमुख

## अट्टल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन संपन्न

गेवराई, (प्रतिनिधी) : 'राष्ट्रीय सेवा योजना हे संस्काराचे विद्यापीठ आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास, व्यक्तिमत्वाचा विकास होत असतानाच ग्रामीण भागातील विविध समस्यांवर विद्यार्थी काम करतात ही अतिशय महत्वाची गोष्ट आहे. या माध्यमातून विद्यार्थी संविधान मूल्यांची जोपासना करत असतात. आजही संविधान मूल्य समाजात रुजवण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेतून संविधान मूल्य रुजतात हा इतिहास आहे' असे राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. आनंद देशमुख यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले की 'गेवराई येथील अट्टल महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला निश्चित फायदा झाला आहे. शिक्षकांनी केलेल्या संस्कारामुळेच आज मी इथपर्यंत आलो. आज या शिबिराच्या निमित्ताने रेवकी ग्रामस्थांनी ज्या पद्धतीने माझे स्वागत केले, हे मी आयुष्यभर विसरु शकणार नाही. आपण सर्व मिळून राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून रचनात्मक कार्य करूया'. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. आनंद देशमुख र.भ.अट्टल महाविद्यालयाच्या सात दिवसीय राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटक म्हणून बोलत होते.

आनंद देशमुख हे र.भ.अट्टल महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून त्यांची डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना संचालकपदी नुकतीच निवड झाली आहे. त्यानिमित्त अट्टल महाविद्यालय आणि रेवती ग्रामस्थांच्या वतीने प्राचार्य प्रोफेसर रजनी शिखरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना आणि उद्घाटनपर मार्गदर्शन करताना विविध विषयांचे संदर्भ देत त्यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

झाडाला पाणी घालून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन समारंभासाठी येणाऱ्या पाहुण्यांचे रेवकी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा करून लेझीम खेळत स्वागत केले. यावेळी अमोल कांबळे यांच्या हलगी पथकावर सर्वांनीच ठेका धरला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य आणि शिबिराच्या निमंत्रक प्रोफेसर रजनी शिखरे या होत्या. याप्रसंगी सरपंच संभाजी चोरमले, केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे, ग्राम विकास अधिकारी विजयकुमार मस्के, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक सचिन ढोले यांच्यासह रेवकी - देवकी येथील ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक, अट्टल महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. सदाफुले यांनी केले. डॉ. राहुल माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर डॉ. अमोल शिरसाट यांनी आभार मानले. मानसी दिसागज या विद्यार्थिनीने स्वागत गीत सादर केले. या शिबीराचा समारोप १७ मार्च रोजी होणार असून तोपर्यंत आयोजित करण्यात आलेल्या सर्व कार्यक्रमांचा गावकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले.





नियमित स्नेह भोजन..




जन्माला येणे आणि मरून जाणे एवढेच महिलांचे आयुष्य नाही - डॉ. संजीवनी तडेगावकर









कवयित्री डॉ.संजीवनी तडेगावकर त्यांची साहित्य संपदा जि.प.शाळेला भेट दिली. यावेळी पंडितराव तडेगावकर यांचीही उपस्थिती होती.



पार्श्वभूमी

14MAR2022

# पार्श्वभूमी

## जन्माला येणे आणि मरून जाणे एवढेच महिलांचे आयुष्य नाही

### डॉ.संजीवनी तडेगावकर यांचे प्रतिपादन

गेवराई, दि.१३(प्रतिनिधी) 'महिलांमध्ये गुणवत्ता असूनही परिघाचे बंध त्यांना स्वातंत्र्य देत नाही. आयुष्य समजून घेण्यासाठी आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी ते परिघाचे बंध कापल्या शिवाय पर्याय नाही. माझे बालपण रेवकीत गेल्याने माझ्या कवितेला इथल्या ग्रामसंस्कृतीचा आणि परिसराचा गंध आहे. माझी कविता याच मातीत रुजली आणि वाढली. आजही माझ्या कवितेतील स्वच्छंदी कल्पना आणि प्रतिमा या बालपणात स्मृतिपटलावर कोरलेल्या रेवकीच्या मातीतील आहे. जन्माला येणे आणि मरून जाणे या पलीकडे माझ्या भगिनींना आयुष्य समजून घेण्यासाठी स्वतःच्या मनाचा विचार करावा लागेल. जन्माला येणे आणि मरून जाणे एवढेच महिलांचे आयुष्य नाही' असे प्रतिपादन मराठीतील ख्यातनाम कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि.बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, सात दिवसीय विशेष निवासी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी या मातीचे शब्द- रंग' या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या कवितांचे सादरीकरणही झाले. या कार्यक्रमात चित्रकार प्रतिक सदाफुले या विद्यार्थी कलाकाराची मुलाखत समाधान इंगळे यांनी घेतली. कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर यांना राज्य शासनाचे विविध पुरस्कार मिळालेले असून विविध विद्यापीठात त्यांच्या कविता अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कार्यक्रमासाठी पंडित तडेगांवकर, सरपंच संभाजी चोरमले, कार्यक्रमाधिकारी डॉ.राहुल माने, डॉ.अमोल शिरसाट, प्रा. शरद सदाफुले यांच्यासह ग्रामस्थ मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. डॉ. समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, सुंदर कांबळे याने सूत्रसंचालन केले तर निशांत ढाकणे ह्याने पाहुण्यांचा परिचय करून दिला.

'महिलांमध्ये गुणवत्ता असूनही परिघाचे बंध त्यांना स्वातंत्र्य देत नाही. आयुष्य समजून घेण्यासाठी आणि स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी ते परिघाचे बंध कापल्या शिवाय पर्याय नाही. माझे बालपण रेवकीत गेल्याने माझ्या कवितेला इथल्या ग्रामसंस्कृतीचा आणि परिसराचा गंध आहे. माझी कविता याच मातीत रुजली आणि वाढली. आजही माझ्या कवितेतील स्वच्छंदी कल्पना आणि प्रतिमा या बालपणात स्मृतिपटलावर कोरलेल्या रेवकीच्या मातीतील आहे. जन्माला येणे आणि मरून जाणे या पलीकडे माझ्या भगिनींना आयुष्य समजून घेण्यासाठी स्वतःच्या मनाचा विचार करावा लागेल. जन्माला येणे आणि मरून जाणे एवढेच महिलांचे आयुष्य नाही' असे प्रतिपादन मराठीतील ख्यातनाम कवयित्री डॉ. संजीवनी तडेगावकर यांनी केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि.बीड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, सात दिवसीय विशेष निवासी शिबिराच्या तिसऱ्या दिवशी 'या मातीचे शब्द- रंग' या सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत त्या बोलत होत्या. यावेळी त्यांच्या कवितांचे सादरीकरणही झाले. या कार्यक्रमात चित्रकार प्रतिक सदाफुले या विद्यार्थी कलाकाराची मुलाखत समाधान इंगळे यांनी घेतली.

कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर यांना राज्य शासनाचे विविध पुरस्कार मिळालेले असून विविध विद्यापीठात त्यांच्या कविता अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत.

'घरंदाज घरांच्या भिंतींनाही
असतात म्हणे कान
म्हणूनच आपण आपली गुपिते
मनमोकळ्या रस्त्यांना सांगावी'

अशा आशयघन कवितांचे सादरीकरण करून कवयित्री डॉ. संजीवनी तडेगांवकर यांनी रसिकांची मने जिंकली आणि अनेक आठवणींना उजाळा दिला. स्त्री शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी पटवून दिले. महिलांनी सक्षम व्हायला हवे, त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळावे, यासाठीही त्यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी पंडित तडेगांवकर, सरपंच संभाजी चोरमले, कार्यक्रमाधिकारी डॉ.राहुल माने, डॉ.अमोल शिरसाट, प्रा. शरद सदाफुले यांच्यासह ग्रामस्थ मंडळींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. डॉ. समाधान इंगळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, सुंदर कांबळे याने सूत्रसंचालन केले तर निशांत ढाकणे ह्याने पाहुण्यांचा परिचय करून दिला.

**श्रमदान.. वृक्षारोपण.. प्लास्टिक निर्मूलन.. जल संवर्धन.. आरोग्य.. ग्राम स्वच्छता यावर भर..**











2022/3/15 09:30









आरोग्यवर्धिन उपकेंद्र रेवकी








## 'महिलांच्या आरोग्याविषयी पुरुषांनीच जागरूक व्हावे - डॉ. रचना शेळके

'जोपर्यंत महिला गंभीर आजारी पडत नाही तोपर्यंत त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही. महिलांच्या आरोग्याच्या अनेक समस्या असतात. परंतु त्यावर चर्चा होत नाही. महिलांसाठीच महिलांच्या आरोग्याचे प्रबोधन कार्यक्रम होतात, मात्र महिलांच्या आरोग्याविषयी पुरुषांना जागृत करणे जास्त आवश्यक आहे' असे मत डॉ. रचना शेळके - मोटे यांनी मांडले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, राष्ट्रीय सेवा योजना, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवारण समिती यांच्या वतीने आयोजित सात दिवसीय विशेष निवासी शिबिराच्या चौथ्या दिवशीच्या बौद्धिक सत्रात महिलांचे आरोग्य या विषयावर प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, रेवकी येथील प्रमुख आणि कार्यक्रमांच्या प्रमुख पाहुण्या डॉ. रचना शेळके-मोटे या बोलत होत्या.

या विषयावर बोलताना डॉ. रचना शेळके यांनी महिलांचे वय, आहार आणि आरोग्य यांची उत्तम सांगड घातली. त्या म्हणाल्या की 'निसर्गाने स्त्री शरीराची रचना अशी बनवली आहे की वय वर्ष १७ ते ४५ या काळामध्ये हृदयविकार, हाडांचे दुखणे इत्यादी अनेक आजारांची शक्यता कमी असते.

महिला खेड्यातली असो वा शहरातली स्वतःच्या तब्येतीकडे कळत नकळत दुर्लक्षच करत असते आणि याचा परिणाम वयाप्रमाणे शरीरावर दिसून येतो. दैनंदिन जीवनात घरच्या घरी उपलब्ध असणारे खाद्यपदार्थ आणि सूर्यप्रकाश निरोगी शरीरासाठी आवश्यक आहे' कार्यक्रमाची सुरुवात मानसी दिसागज हिच्या प्रार्थनेने झाली. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लक्ष्मी काबरा लिखित व दिग्दर्शित 'स्त्री काल, आज आणि उद्या' ही नाटिका सादर केली.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रेवकी येथील शिक्षिका वर्षा महामुनी अध्यक्षस्थानी होत्या. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख डॉ. वृषाली गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, आरोग्य केंद्राच्या आशाताई, ग्रामस्थ इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुदर्शना बढे यांनी केले, तर शांभवी बोर्डे हिने आभार मानले.






दिव्य मराठी

# बीड जिल्हा 17-03-2022

**दिव्य मराठी विशेष** • रेवकी येथील शिबिरात डॉ. रचना शेळकेंचे प्रतिपादन

## महिला आरोग्यासाठी पुरुष जागृत हवेत

प्रतिनिधी | गेवराई

जोपर्यंत महिला गंभीर आजारी पडत नाही तोपर्यंत त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही. महिलांच्या आरोग्याच्या अनेक समस्या असतात. परंतु त्यावर चर्चा होत नाही. महिलांसाठीच महिलांच्या आरोग्याचे प्रबोधन कार्यक्रम होतात, मात्र महिलांच्या आरोग्याविषयी पुरुषांना जागृत करणे जास्त आवश्यक आहे असे मत डॉ. रचना शेळके (मोटे) यांनी मांडले.

आर. बी. अट्टल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रेवकी येथे महिला कक्ष व अंतर्गत तक्रार निवारण समितीतर्फे सात दिवसीय विशेष निवासी शिबिराच्या चौथ्या दिवशीच्या बौद्धिक सत्रात महिलांचे आरोग्य या विषयावर डॉ. रचना शेळके या बोलत होत्या.

डॉ. शेळके यांनी महिलांचे वय, आहार आणि आरोग्य यांची उत्तम सांगड घातली. त्या म्हणाल्या की 'निसर्गाने स्त्री शरीराची रचना अशी बनवली आहे की वय वर्ष १५ ते ४५ या काळामध्ये हृदयविकार, हाडांचे दुखणे इत्यादी अनेक आजारांची शक्यता कमी असते. महिला खेड्यातली असो वा शहरातली स्वतःच्या तब्येतीकडे कळत नकळत दुर्लक्षच करत असते आणि याचा परिणाम वयाप्रमाणे शरीरावर दिसून येतो. दैनंदिन जीवनात



घरच्या घरी उपलब्ध असणारे खाद्यपदार्थ आणि सूर्यप्रकाश निरोगी शरीरासाठी आवश्यक आहे.

या कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रेवकी येथील शिक्षिका वर्षा महामुनी अध्यक्षस्थानी होत्या. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या प्रमुख

### नाटिकेचे सादरीकरण

कार्यक्रमाची सुरुवात मानसी दिसागज हिच्या प्रार्थनेने झाली. शेवटी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लक्ष्मी कावरा लिखित व दिग्दर्शित 'स्त्री काल, आज आणि उद्या' नाटिका सादर केली.

डॉ. वृषाली गव्हाणे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, आरोग्य केंद्राच्या आशाताई, ग्रामस्थ इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुदर्शना बढे यांनी केले, तर शांभवी बोर्डे हिने आभार मानले.

## शिवार अभ्यास भेटीतून विद्यार्थ्यांना मिळाली प्रेरणा |अट्टल महाविद्यालयाचा रेवकी येथील शिबिरातील उपक्रम

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, रेवकी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय विशेष निवासी शिबिरात शिवार भेटीचे आयोजन करण्यात आले होते. गावात शिबिर घेत असताना गावाचा परिचय होतो, मात्र गावाचे शिवार,

शिवारातील पीक पद्धती, मातीचा पोत आणि प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद असे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या अंतर्गत प्रगतिशील शेतकरी रामभाऊ देवकते यांच्या शेतात शिवार अभ्यास भेटीचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने रेवकी येथील शेतकऱ्यांच्या प्रातिनिधिक भावना जाणून घेण्यात आल्या. रामभाऊ देवकते यांनी आपल्या शिवारात विविध पिके घेऊन, विविध प्रकारची झाडे लावून ती जोपासली आहेत. अभ्यासपूर्ण शेती करताना पीक आणि पाणी यावर ते जोर देतात. परिश्रम आणि प्रामाणिकता ही शेतीत कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आवश्यक असते या गोष्टीचा त्यांनी उल्लेख केला. 'शेती हा फायद्याचा उद्योग आहे, मात्र आपल्याकडे शेती उद्योग हा तोट्यात चालला आहे. शेतकऱ्यांचा आणि समाजाचा शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला नाही, मात्र नव्या पिढीने शेतीकडे वळून आधुनिक शेती करावी. चांगले आरोग्य राखावे आणि चांगले जीवनमान जगावे, असा सल्ला त्यांनी दिला. शिबिरात सहभागी बहुतेक शेतकरी कुटुंबातील मुले असल्याने त्यांना या शिवार भेटीचा खूप लाभ झाला. शेती व्यवसायाकडे बघण्याच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला. या सर्व शिबिरार्थींनी देवकते त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे आभार मानले. सर्व शिबिरार्थींना देवकते परिवाराने स्नेहभोजन दिले. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, प्रा. हनुमंत हेळंबे, सुदर्शन निकम, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल गायकवाड यांच्यासह शिबिरार्थी उपस्थित होते.



शिवार अभ्यास फेरीत विद्यार्थ्यांनी शेततळ्याची पाहणी केली.



शिवार अभ्यास फेरीत विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला..



# कार्यारंभ

Thursday 2022/03/17

## शिवार अभ्यास भेटीतून विद्यार्थ्यांना मिळाली प्रेरणा

### अट्टल महाविद्यालयाचा उपक्रम

प्रतिनिधी । गेवराई

दि.१६ : येथील र. भ. अट्टल महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व रेवकी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सात दिवसीय विशेष निवासी शिबिरात शिवार भेटीचे आयोजन करण्यात आले होते. गावात शिबीर घेत असताना गावाचा परिचय होतो, मात्र गावाचे शिवार, शिवारातील पीक पद्धती, मातीचा पोत आणि प्रत्यक्ष कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांशी संवाद असे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रगतिशील शेतकरी रामभाऊ देवकते यांच्या शेतात शिवार अभ्यास भेटी देण्यात आली. या निमित्ताने रेवकी येथील शेतकऱ्यांच्या प्रातिनिधिक भावना जाणून घेण्यात आल्या. शेती हा फायद्याचा उद्योग आहे, मात्र आपल्याकडे शेती उद्योग हा तोट्यात चालला आहे. शेतकऱ्यांचा आणि समाजाचा



शेतीकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला नाही, मात्र नव्या पिढीने शेतीकडे वळून आधुनिक शेती करावी.

चांगले आरोग्य राखावे आणि चांगले जीवनमान जगावे, असा सल्ला त्यांनी दिला. शिबिरात सहभागी बहुतेक शेतकरी कुटुंबातील मुले असल्याने त्यांना या शिवार भेटीचा खूप लाभ झाला. शेती व्यवसायाकडे बघण्याच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनात बदल झाला.

या सर्व शिबिरार्थीनी देवकते त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे आभार मानले. सर्व शिबिरार्थींना देवकते परिवाराने स्नेहभोजन दिले. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, प्रा. हनुमंत हेळंबे, सुदर्शन निकम, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल गायकवाड यांच्यासह शिबिरार्थी उपस्थित होते.

## गावाने ठरवले तरच विकास शक्य - गणेश सावंत

'एखाद्या व्यक्तीमुळे एखादे गाव मोठे होत नसते तर गावाने ठरवले तरच एखादी व्यक्ती मोठी होते आणि गावाचा ही कायापालट होतो. नावारूपाला आलेल्या गावांचा परिचय काही व्यक्तींच्या नावाने होतो मात्र त्या व्यक्तींची नावे मोठे करण्यासाठी गावातील प्रत्येक व्यक्ती आपले योगदान देत असतो. अशा योगदानामुळेच गावांचा विकास शक्य होतो' असे मत गणेश सावंत यांनी व्यक्त केले. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, ग्रामपंचायत रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात 'ग्रामीण विकासातील युवकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ग्राम विकास घडवून आणण्यासाठी युवकांनी विविध ठिकाणी उभारलेल्या कामांची दाखले देत वर्तमान काळात गावांची सुधारणा घडवून आणण्यासाठी राजकारण विरहित शासकीय योजनांचा डोळसपणे फायदा घेऊन भविष्य उज्ज्वल करण्याची संधी आहे, असेही ते म्हणाले.

याच कार्यक्रमात अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या जयंतीनिमित्त 'आजची तरुणाई आणि विज्ञान' या विषयावर धर्मराज करपे यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करून युवकांनी स्वतःच्या आयुष्यात बदल घडवून आणावा असे आवाहन केले. विज्ञानामुळे आपले आयुष्य आणि

भविष्य प्रगतिपथावर जाऊ शकते. विज्ञानाचा वापर केल्यापेक्षा वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारणे आवश्यक आहे, असेही धर्मराज करपे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट, प्रा. शरद सदाफुले यांच्यासह शिबिरार्थी आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास रसाळ याने केले तर गणेश सावंत यांचा परिचय सचिन हातागळे आणि धर्मराज करपे यांचा परिचय सिद्धेश्वर राऊत यांनी करून दिला. शरद मोटे याने आभार मानले.






पाहुण्यांचे स्वागत करताना | वक्ते श्री.धर्मराज करपे




पाहुण्यांसोबत समूह छायाचित्र






कार्यारंभ

Sunday 2022/03/20

# गावाने ठरवले तरच विकास शक्य –गणेश सावंत

प्रतिनिधी। गेवराई

दि.१९ : 'एखाद्या व्यक्तीमुळे एखादे गाव मोठे होत नसते तर गावाने ठरवले तरच एखादी व्यक्ती मोठी होते आणि गावाचा ही कायापालट होतो. नावारूपाला आलेल्या गावांचा परिचय काही व्यक्तींच्या नावाने होतो मात्र त्या व्यक्तींची नावे मोठे करण्यासाठी गावातील प्रत्येक व्यक्ती आपले योगदान देत असतो. अशा योगदानामुळेच गावांचा विकास शक्य होतो' असे मत गणेश सावंत यांनी व्यक्त केले.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शहरातील र. भ. अट्टल महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर



मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, ग्रामपंचायत रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिरात 'ग्रामीण विकासातील युवकांची भूमिका' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ग्राम विकास घडवून आणण्यासाठी युवकांनी विविध ठिकाणी उभारलेल्या कामांची दाखले देत वर्तमान काळात गावांची सुधारणा घडवून आणण्यासाठी राजकारण विरहित शासकीय योजनांचा डोळसपणे फायदा घेऊन भविष्य उज्वल करण्याची संधी आहे, असेही ते म्हणाले. याच कार्यक्रमात अल्बर्ट आईन्स्टाईन यांच्या जयंतीनिमित्त 'आजची तरुणाई आणि विज्ञान' या विषयावर धर्मराज करपे यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आत्मसात करून युवकांनी स्वतःच्या आयुष्यात बदल घडवून आणावा असे आवाहन केले. विज्ञानामुळे आपले आयुष्य आणि भविष्य प्रगतिपथावर जाऊ शकते. विज्ञानाचा वापर केल्यापेक्षा वैज्ञानिक दृष्टीकोन अंगीकारणे आवश्यक आहे, असेही धर्मराज करपे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले. याप्रसंगी कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ.अमोल शिरसाट, प्रा.शरद सदाफुले यांच्यासह शिबिरार्थी आणि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कैलास रसाळ याने केले तर गणेश सावंत यांचा परिचय सचिन हातागळे आणि धर्मराज करपे यांचा परिचय सिद्धेश्वर राऊत यांनी करून दिला. शरद मोटे याने आभार मानले.

## अट्टल महाविद्यालयाच्या रा. से. यो. शिबिरात पतंजली योग समितीचे प्रशिक्षण

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबिर रेवकी या गावी दिनांक ११ ते १७ मार्च यादरम्यान संपन्न झाले. या सात दिवसीय निवासी शिबिराची सुरुवात योग प्राणायाम आणि व्यायामाने करण्यात आली. यासाठी मार्गदर्शक म्हणून पतंजली योग समिती, गेवराई येथील योग्य शिक्षकांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थी स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. योगा, प्राणायाम आणि व्यायामाचे फायदे सांगितले. त्याचबरोबर स्वतःच्या आयुष्यात नियमितपणे योगा, प्राणायाम करून त्यांचा प्रचार - प्रसार करण्याच आवाहन केले.

योगगुरु प्रा. राजेंद्र बरकसे यांच्या मार्गदर्शनाखाली योगशिक्षक ज्ञानेश्वर तिवारी, योगशिक्षक रवींद्र नाटकर, योगशिक्षक राम चाळक, योगशिक्षक अशोक गायकवाड यांनी सकाळी ६ वाजता रेवकी येथे येऊन विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले. यामुळे विद्यार्थी आणि गावकरी यांच्यात योगा, प्राणायाम या विषयी जागृती निर्माण झाली. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी शिबिरात आरोग्य संवर्धक उपक्रमांमध्ये योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. राहुल माने, प्रा. शरद सदाफुले, डॉ. वृषाली गव्हाणे आदींनी केले. तर राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल गायकवाड याने विद्यार्थी समन्वयाची जबाबदारी पार पाडली.













दिव्य मराठी **बीड जिल्हा** 22-03-2022

# अट्टल महाविद्यालयात पतंजली योग समितीकडून प्रशिक्षण



**प्रतिनिधी** | गेवराई

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबिर रेवकी या गावी दिनांक ११ ते १७ मार्च यादरम्यान झाले. या सातदिवसीय निवासी शिबिराची सुरुवात योग प्राणायाम आणि व्यायामाने करण्यात आली. यासाठी मार्गदर्शक म्हणून पतंजली योग समिती, गेवराई येथील योग्य शिक्षकांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थी स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. योगा, प्राणायाम आणि व्यायामाचे फायदे सांगितले. त्याचबरोबर स्वतःच्या आयुष्यात नियमितपणे योगा, प्राणायाम करून त्यांचा प्रचार - प्रसार करण्याच आवाहन केले. शिबिराचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. राहुल माने, प्रा. शरद सदाफुले, डॉ. वृषाली गव्हाणे आर्दीनी केले. तर राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल गायकवाड याने विद्यार्थी समन्वयाची जबाबदारी पार पाडली.

दिव्य **लोकप्रभा**

Tue 22-03-2022
Page No. 5

# अट्टल महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात पतंजली योग समितीचे प्रशिक्षण

**गेवराई (काझी अमान):** मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे शिबिर रेवकी या गावी दिनांक ११ ते १७ मार्च यादरम्यान संपन्न झाले. या सात दिवसीय निवासी शिबिराची सुरुवात योग प्राणायाम आणि व्यायामाने करण्यात आली. यासाठी मार्गदर्शक म्हणून पतंजली योग समिती, गेवराई येथील योग्य शिक्षकांनी राष्ट्रीय सेवा योजना शिबिरार्थी स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले. योगा, प्राणायाम आणि व्यायामाचे फायदे सांगितले. त्याचबरोबर स्वतःच्या आयुष्यात नियमितपणे योगा, प्राणायाम करून त्यांचा प्रचार-प्रसार करण्याच आवाहन केले. योगगुरु प्रा. राजेंद्र बरकसे यांच्या मार्गदर्शनाखाली योगशिक्षक ज्ञानेश्वर तिवारी, योगशिक्षक रवींद्र नाटकर, योगशिक्षक राम चाळक, योगशिक्षक अशोक गायकवाड यांनी सकाळी ६ वाजता रेवकी येथे येऊन विद्यार्थ्यांना योगाचे प्रशिक्षण दिले. यामुळे विद्यार्थी आणि गावकरी यांच्यात योगा, प्राणायाम या विषयी जागृती निर्माण झाली. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय निवासी शिबिरात आरोग्य संवर्धक उपक्रमांमध्ये योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे संचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. अमोल शिरसाट, डॉ. राहुल माने, प्रा. शरद सदाफुले, डॉ. वृषाली गव्हाणे आर्दीनी केले. तर राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी प्रतिनिधी राहुल गायकवाड याने विद्यार्थी समन्वयाची जबाबदारी पार पाडली.

दि.१५ मार्च २०२२ रोजी दुपारी १ वाजता बौद्धिक सत्रात सेंद्रिय शेती या विषयावर डॉ.अनिरुद्ध बुद्रुककर यांनी मार्गदर्शन केले.




दि.१६ मार्च २०२२ रोजी दुपारी १ वाजता बौद्धिक सत्रात पाणी परीक्षण  या विषयावर डॉ.सुनील भगत  यांनी मार्गदर्शन केले.





शिबिराच्या सांस्कृतिक कार्यक्रमातील बक्षीस अनाथालयास भेट

शिबिरातील ७९५६ रूपयांचे बक्षीस बालग्राम सहारा अनाथालयास भेट

रेवकी - देवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय निवासी शिबिर विविध कार्यक्रम आणि उपक्रमातून सुरू आहे. या शिबिरातील शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी यांचा संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम 'गॅदरिंग' आयोजित करण्यात आला होता. यामध्ये रेवकी - देवकी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला. जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांचा सराव करून घेतल्याने या विद्यार्थ्यांनी सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. तसेच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या र. भ.अट्टल  महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक शिबिरार्थी यांनीही या शिबिरात विविध कलाप्रकार सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी रसिकप्रेक्षकांना साद घालत बालग्राम अनाथालयातील बालकांसाठी बक्षीसातील निधी देण्याचे आवाहन करत गीते सादर केली. तेव्हा सर्व महिला व पुरुष मंडळींनी बक्षीस रूपाने ६४५७ रुपयाचा निधी या कार्यक्रमात उभा केला. दुसऱ्या दिवशी नभा, उमेश, अमरजीत, समाधान इंगळे परिवार यांच्या प्रबोधनपर सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमातही दीड हजार

रुपये निधी जमा झाला. हा संपूर्ण निधी सहारा बालग्राम अनाथालय, गेवराई येथील संचालक संतोष गर्जे व प्रीती गर्जे यांना सुपूर्द करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमातून मिळालेली बक्षिसे शाळेतील, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी व कलावंतांनी अनाथालयातील बालकांसाठी दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अट्टल महाविद्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, रेवकी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबिर रेवकी - देवकी येथे संपन्न झाले. या शिबिरातील सांस्कृतिक कार्यक्रमाची चर्चा पंचक्रोशीत तसेच सर्वदूर पोहोचली. या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, श्रीकांत पाटील तसेच ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाधिकारी म्हणून राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे डॉह राहुल माने, डॉ. अमोल सिरसाठ, प्रा. सदाफुले यांनी कार्यक्रमांचे नियोजन केले होते.

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षांपासून शाळा - महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलने बंद असल्याने विद्यार्थ्यांची सांस्कृतिक भूक भागवण्याचे काम या शिबिराच्या माध्यमातून करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही वैविध्यपूर्ण सादरीकरणातून आपल्यातील कलागुणांना वाव देत रसिकांची वाहवा मिळवली.










समर्थ
# लोकयोद्धा
SAMARTH LOKYODDHA
संपादक : विनोद नरसाळे
ंक २७ वा शुक्रवार, दिनांक २५ मार्च २०२२ RNI NO : MAHMAR/2021/80629 साप्ताहिक मराठी E-mail : samarthlokyoddha@

## शिबिरातील ७९५६ रुपयांचे बक्षीस बालग्राम सहारा अनाथालयास भेट

**गेवराई (प्रतिनिधी) रेवकी – देवकी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सात दिवसीय निवासी शिबिर विविध कार्यक्रम आणि उपक्रमातून सुरू आहे. या शिबिरातील शिबिरार्थी आणि गावातील विद्यार्थी यांचा संयुक्त सांस्कृतिक कार्यक्रम मगॅदरिंगफ आयोजित करण्यात आला होता. यामध्ये रेवकी – देवकी येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.**

जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी विविध गाण्यांवर विद्यार्थ्यांचा सराव करून घेतल्याने या विद्यार्थ्यांनी सादरीकरणातून रसिकांची मने जिंकली. तसेच मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या र. भ.अट्टल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक शिबिरार्थी यांनीही या शिबिरात विविध कलाप्रकार सादर करत रसिकांना मंत्रमुग्ध केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी रसिकप्रेक्षकांना साद घालत बालग्राम



अनाथालयातील बालकांसाठी बक्षीसातील निधी देण्याचे आवाहन करत गीते सादर केली. तेव्हा सर्व महिला व पुरुष मंडळींनी बक्षीस रूपाने ६४५७ रुपयाचा निधी या कार्यक्रमात उभा केला. दुसऱ्या दिवशी नभा, उमेश, अमरजीत, समाधान इंगळे परिवार यांच्या प्रबोधनपर सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमातही दीड हजार रुपये निधी जमा झाला. हा संपूर्ण निधी सहारा बालग्राम अनाथालय, गेवराई पान २ वर

## गाव पंगतीने गावकऱ्यांनी दिला शिबिराला समारोप
## उपस्थितांचे फेटे बांधून स्वागत केल्यामुळे समारोपाला आले उत्सवाचे स्वरूप
## अट्टल महाविद्यालयाच्या रेवकी येथील रासेयो शिबिराचा समारोप थाटात

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,
**र. भ. अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड**
**आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि ग्रामपंचायत कार्यालय, रेवकी**
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
शुक्रवार, दि. ११ ते गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ * ठिकाण : रेवकी –देवकी, ता. गेवराई, जि. बीड

**सात दिवसीय विशेष निवासी शिबीर**

**समारोप समारंभ**

गुरुवार, दि. १७ मार्च २०२२ * सकाळी १०.३० वा.

**अध्यक्ष : मा.श्री.अमरसिंह पंडित** (उपाध्यक्ष, मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद)

: प्रमुख उपस्थिती :

**मा.ॲड.एच.एस.पाटील** (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
**मा.श्री.भगवान मोटे** (निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती)
**मा.श्री.सचिन सानप,** (गट विकास अधिकारी, गेवराई)
**डॉ.पंडित खाकरे** (जिल्हा समन्वयक, रासेयो, बीड)

निमंत्रक : **प्रोफेसर रजनी शिखरे** (प्राचार्य, र.भ.अट्टल महाविद्यालय)

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि रेवकी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबीराचा निरोप समारंभ वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. दि. ११ ते १७ मार्च दरम्यान सात दिवसीय निवासी विशेष शिबीरात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकारी यांनी केलेल्या परिश्रमामुळे व उद्बोधन प्रबोधनामुळे गावातील प्रतिष्ठित मंडळींनी एकत्रित येऊन समारोपाच्या दिवशी संपूर्ण गावाला गोड जेवण दिले.

विद्यार्थ्यांनी सात दिवसीय शिबिरात महापुराने बाधित झालेल्या नदीकाठच्या परिसराला पूर्व रूप प्राप्त करून दिले. आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, अहिल्याबाई होळकर स्मारक, गावातील रस्ते तसेच गावातील नाल्यांची स्वच्छता, विहीर स्वच्छता असे उपक्रम राबवत असताना दोन वर्षांपासून खंडित झालेल्या वार्षिक स्नेह संमेलनाची भरपाई गावातील विद्यार्थी व शिबिरातील विद्यार्थी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. महत्त्वपूर्ण विषयांवरील व्याख्याने, बौद्धिके, मान्यवर कवी - गायक - शाहीर यांना निमंत्रित करून गावात निर्माण केलेली साहित्यिक, सांस्कृतिक जाणीव, गावातील शिवारात अभ्यास भेटीच्या निमित्ताने शेतकऱ्यांशी साधलेला संवाद, सात दिवसात पतंजली योग समितीच्या वतीने आयोजित केलेले योग - प्राणायाम - व्यायाम शिबिर अशा वैविध्यपूर्ण भरगच्च कार्यक्रमांमुळे गावातील सर्वच मंडळी प्रभावित झाली होती. दरम्यानच्या काळात गावातील काही प्रतिष्ठित मंडळींनी शिबिरार्थींना अन्नदान देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. तर शेवटच्या दिवशी संपूर्ण गावाने एकत्रित येऊन शिबिरार्थींसह गावकऱ्यांना मिष्ठान्न भोजन दिले. यामुळे गावातील एकोपा, दूरदृष्टीपणा व भविष्यातील उपक्रमांची नांदी प्रस्तुत झाली.

ग्राम विकासातील युवकांचे योगदान, ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य, ग्रामीण भागातील वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता, ग्रामीण भागातील आरोग्याच्या समस्या अशा विविध उद्देशांनी हे शिबिर यशस्वी झाले. शिबिराच्या समारोप कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, तर प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी सचिन सानप यांची उपस्थिती होती. यावेळी सचिन सानप यांनी शिबिराच्या कार्याविषयी आणि गावकऱ्यांच्या प्रतिसाद याविषयी प्रसन्नता व्यक्त करून पुढच्या शिबिरात सक्रिय सहभागी होण्याची भावना व्यक्त केली.

समारोपाच्या दिवशी गावातील असंख्य महिला - तरुण - गावकरी यांची उपस्थिती बघून सर्वांनाच आश्चर्य वाटत होते. घरोघरी रांगोळ्या काढून, लेझीम खेळत, हलगी पथकाच्या तालावर नाचत समारोपाच्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. अबालवृद्ध अतिशय उत्साहात शिबिरात सहभागी झाले होते. अट्टल महाविद्यालयाचे चित्रकार विद्यार्थी प्रतीक सदाफुले, लक्ष्मण बाबरे यांच्या चित्रांचे प्रदर्शनही यावेळी भरविण्यात आले होते.

यावेळी मंचावर सरपंच संभाजी चोरमले, उद्यान पंडित राजाभाऊ आतकरे, केंद्रीय मुख्याध्यापक बाळाभाऊ पिंपळे, उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रबंधक बप्पासाहेब पिंपळे यांच्यासह विलास देवकते, राजू अष्टकर, कमळाजी यमगर, सयाजी जायभाय, भागवत अष्टकर, रामभाऊ देवकते यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, डॉ. अमोल शिरसाट. प्रा. शरद सदाफुले, डॉ. वृषाली गव्हाणे यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक प्रतिनिधी राहुल गायकवाड आणि रेवती सुतार यांनी कार्यक्रमाच्या संयोजनात पुढाकार घेतला. समारोपाच्या प्रसंगी गावकऱ्यांनी फेटे बांधून आलेल्या पाहुण्यांचे, शिबिरार्थींचे स्वागत केले. जिल्हा परिषदेतील सर्व शिक्षक वृंद, आरोग्य केंद्राच्या डॉ. रचना शेळके यांनी संपूर्ण शिबिरात सहभाग नोंदवून मार्गदर्शन केले. शिबिरार्थी स्वयंसेवकांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात

आले. याप्रसंगी अमरजीत बाहेती, नभा इंगळे, गणेश डोंगरे, उमेश इंगळे यांनी स्वागत गीत सादर केले. अमोल कांबळे यांच्या हलगी पथकाने समारोपाच्या कार्यक्रमात रंगत आणली. समारोपाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. समाधान इंगळे यांनी केले, प्रस्ताविक प्रा. शरद सदाफुले यांनी केले तर डॉ. वृषाली गव्हाणे यांनी आभार मानले.

समारोप समारंभाची काही क्षणचित्रे..

























आपला महाराष्ट्र | आपल्या बातम्या, आतल्या बातम्या | संमिश्र | महाभारत | गुरूवार दि.२४ मार्च २०२२ | ३

# गाव पंगतीने गावकऱ्यांनी दिला शिबिराला समारोप

## उपस्थितांचे फेटे बांधून स्वागत केल्यामुळे समारोपाला आले उत्सवाचे स्वरूप

गेवराई/प्रतिनिधी(दै.महाभारत)–

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद आणि रेवकी ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय सेवा योजना सात दिवसीय निवासी शिबीराचा निरोप समारंभ वेगळ्या पद्धतीने साजरा झाला. दि. ११ ते १७ मार्च दरम्यान सात दिवसीय निवासी विशेष शिबीरात राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकारी यांनी केलेल्या परिश्रमामुळे व उद्बोधन प्रबोधनामुळे गावातील प्रतिष्ठित मंडळींनी एकत्रित येऊन समारोपाच्या दिवशी संपूर्ण गावाला गोड जेवण दिले.

विद्यार्थ्यांनी सात दिवसीय शिबिरात महापुराने बाधित झालेल्या नदीकाठच्या परिसराला पूर्व रूप प्राप्त करून दिले. आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा, अहिल्याबाई होळकर स्मारक, गावातील रस्ते तसेच गावातील नाल्यांची स्वच्छता, विहीर स्वच्छता असे उपक्रम राबवत असताना दोन वर्षांपासून खंडित झालेल्या वार्षिक स्नेह संमेलनाची भरपाई गावातील विद्यार्थी व शिबिरातील विद्यार्थी यांचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. महत्त्वपूर्ण विषयांवरील व्याख्याने, बौद्धिके, मान्यवर कवी – गायक – शाहीर यांना निमंत्रित करून गावात निर्माण केलेली साहित्यिक, सांस्कृतिक जाणीव, गावातील शिवारात अभ्यास भेटीच्या निमित्ताने शेतकऱ्यांशी साधलेला संवाद, सात दिवसात पतंजली योग समितीच्या वतीने आयोजित केलेले योग – प्राणायाम – व्यायाम शिबिर अशा वैविध्यपूर्ण भरगच्च कार्यक्रमांमुळे गावातील सर्वच मंडळी प्रभावित झाली होती. दरम्यानच्या काळात गावातील काही प्रतिष्ठित मंडळींनी शिबिरार्थींना अन्नदान देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या. तर शेवटच्या दिवशी संपूर्ण गावाने एकत्रित येऊन शिबिरार्थींसह गावकऱ्यांना मिष्ठान्न भोजन दिले. यामुळे गावातील एकोपा, दूरदृष्टीपणा व भविष्यातील उपक्रमांची नांदी प्रस्तुत झाली.

ग्राम विकासातील युवकांचे योगदान, ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य, ग्रामीण भागातील वैज्ञानिक दृष्टिकोनाची आवश्यकता, ग्रामीण भागातील आरोग्याच्या समस्या अशा विविध उद्देशांनी हे शिबिर यशस्वी झाले. शिबिराच्या समारोप कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून अट्टल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, तर प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी सचिन सानप यांची उपस्थिती होती. यावेळी सचिन सानप यांनी शिबिराच्या कार्याविषयी आणि



गावकऱ्यांच्या प्रतिसाद याविषयी प्रसन्नता व्यक्त करून पुढच्या शिबिरात सक्रिय सहभागी होण्याची भावना व्यक्त केली.

# राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन दिनानिमित्त मास्क निर्मिती स्पर्धा

२४ मार्च २०२२

जागतिक क्षयरोग निर्मूलन दिनानिमित्त जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय बीड, सहसंचालक, माहिती शिक्षण व संवाद, महाराष्ट्र, राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील रेड रिबन क्लब मधील ५ महाविद्यालयांना 'मास्क निर्मिती स्पर्धा' हा उपक्रम देण्यात आला होता. त्या अनुषंगाने एचआयव्ही-एड्स जनजागृती करण्याकरिता स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'मास्क निर्मिती स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. रेड रिब्बेन क्लब अंतर्गत विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. अट्टल महाविद्यालय हे जिल्ह्यातील पाच रेड रिबन क्लब पैकी निवडले गेलेले एक महाविद्यालय आहे. या स्पर्धेसाठी विजेत्या विद्यार्थ्यांची निवड महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील डॉ. राजश्री हिवरेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. समाधान इंगळे, प्रा. शरद सदाफुले यांनी केली.

आपण बनवलेले मास्क आणि त्याचे वैशिष्ट्य यासाठी गुणदान करण्यात आले. यामध्ये बीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी बुशरा अय्युब शेख हीस प्रथम क्रमांकाचे बक्षीस रुपये ५०००/-, दिसागज मानसी ज्ञानेश्वर द्वितीय पारितोषिक रुपये ३०००/- तर कोमल रमेश सुपेकर या विद्यार्थिनीने तृतीय पारितोषिक रुपये २०००/- पटकावले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आरोग्य विषयक संदेश देऊन जनजागृती निर्माण करण्यासाठी हे मास्क उपयुक्त ठरणार आहे. विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन महाविद्यालय प्रशासन आणि उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी केले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, विक्रम तिडके, उपजिल्हा रुग्णालय गेवराई यांची उपस्थिती होती.

*फोटो आणि संबंधित बातमी*









### पार्श्वभूमी

## मास्क निर्मिती स्पर्धेला अट्टल महाविद्यालयात उत्स्फूर्त प्रतिसाद



गेवराई दि २५(प्रतिनिधी)- जागतिक क्षयरोग निर्मूलन दिनानिमित्त जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष जिल्हा रूग्णालय बीड, सहसंचालक, माहिती शिक्षण व संवाद, महाराष्ट्र, राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील रेड रिबन क्लब मधील ५ महाविद्यालयांना 'मास्क निर्मिती स्पर्धंत अटल महाविद्यालयात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

एचआयव्ही-एड्स जनजागृती करण्याकरिता स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'मास्क निर्मिती स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. रेड रिबेन क्लब अंतर्गत विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. अट्टल महाविद्यालय हे जिल्ह्यातील ५ रेड रिबन क्लब पैकी निवडले गेलेले एक महाविद्यालय आहे. या स्पर्धेसाटी विजेत्या विद्यार्थ्यांची निवड महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील डॉ. राजश्री हिवरेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृपाली गव्हाणे, डॉ. समाधान इंगळे, प्रा. शरद सदाफुले यांनी केली. आपण बनवलेले मास्क आणि त्याचे वैशिष्ट यासाटी गुणदान करण्यात आले. यामध्ये बीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी बुशरा अय्युब शेख हीस प्रथम क्रमांकाचे बक्षीस रुपये ५हजार, दिसागज मानसी ज्ञानेश्वर द्वितीय पारितोषिक रुपये ३हजार, तर कोमल रमेश सुपेकर या विद्यार्थिनीने तृतीय पारितोषिक रुपये २हजार पटकावले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आरोग्य विषयक संदेश देऊन जनजागृती निर्माण करण्यासाटी हे मास्क उपयुक्त टरणार आहे. विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन महाविद्यालय प्रशासन आणि उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य कर्मचाऱ्यांनी केले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, विक्रम तिडके, उपजिल्हा रुग्णालय गेवराई यांची उपस्थिती होती.

### लोकमत



गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयात मास्कनिर्मिती स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

## मास्कनिर्मिती स्पर्धेत बुशरा शेख प्रथम

लोकमत न्यूज नेटवर्क

**गेवराई :** एचआयव्ही एड्स जनजागृती करण्यासाठी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त 'मास्कनिर्मिती स्पर्धा' आयोजित केली होती. यात बुशरा शेख हिने अव्वल स्थान मिळवले.

जागतिक क्षयरोग निर्मूलन दिनानिमित्त जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष जिल्हा रुग्णालय सहसंचालक, माहिती शिक्षण व संवाद, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई आणि राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था नवी दिल्ली यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील रेड रिबन क्लबमधील पाच महाविद्यालयांना 'मास्क निर्मिती स्पर्धा' हा उपक्रम दिला होता.

गेवराई येथील र. भ. अट्टल महाविद्यालयात ही स्पर्धा पार पडली. विजेत्या विद्यार्थ्यांची निवड प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, उपजिल्हा रुग्णालय डॉ. राजश्री हिवरेकर, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे, डॉ. समाधान इंगळे, प्रा. शरद सदाफुले यांनी केली.

यामध्ये बीए प्रथम वर्षाची विद्यार्थिनी बुशरा अयूब शेख हिने प्रथम, दिसागज मानसी ज्ञानेश्वर द्वितीय, कोमल रमेश सुपेकर या विद्यार्थिनीने तृतीय पारितोषिक पटकावले. यावेळी आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, विक्रम तिडके उपस्थित होते.

Hello Beed
Page No. 3 Mar 28, 2022
Powered by: erelego.com

## भित्तीपत्रक आणि सेल्फी विथ स्लोगन स्पर्धा

२८ मार्च २०२२

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड येथे India @75 अंतर्गत रक्तदान, क्षयरोग जागृती भित्तीपत्रक आणि सेल्फी विथ स्लोगन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.महादेव चिंचोले व जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी साधना गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली व समुपदेशक राजश्री हिवरेकर उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत रेड रिबन क्लबच्या वतीने HIV/AIDS जनजागृती करिता १) स्वेच्छा रक्तदान या विषयावर पोस्टर स्पर्धा, २) एचआयव्ही /टीबी जनजागृती यासंदर्भात शॉर्ट व्हिडिओ फिल्म तयार करणे, ३) स्वेच्छा रक्तदान या विषयावर शॉर्ट व्हिडिओ फिल्म तयार करणे आणि ४) सेल्फी विथ स्लोगन (फोटो) स्पर्धा या चार प्रकारातील स्पर्धा घेण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, प्रा.शरद सदाफुले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

यापैकी भित्तीपत्रक स्पर्धेत १) प्रथम पारितोषिक - मानसी ज्ञानेश्वर दिसागज (बी.एस्सी. प्रथम वर्ष), २) द्वितीय पारितोषिक - लाड दिपाली शेषराव आणि पाठक आरती प्रमोद (बी.एस्सी. द्वितीय वर्ष) यांना विभागून देण्यात आले, तर ३) तृतीय पारितोषिक- काकडे कोमल एकनाथ (बी.एस्सी. प्रथम वर्ष) या विद्यार्थिनीने पटकाविले.

सेल्फी विथ स्लोगन या स्पर्धेत १) प्रथम पारितोषिक - दुरांडे विक्रम भागवत (बी.ए. तृतीय वर्ष), २) द्वितीय पारितोषिक - बाबरे लक्ष्मण अजिनाथ (बी.एस्सी. प्रथम वर्ष) आणि ३) तृतीय पारितोषिक सुळ सोमेश्वर रंगनाथ (बी.एस्सी प्रथम वर्ष) या विद्यार्थ्याने पटकाविले.

विजेत्या स्पर्धकांना जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी, बीड यांच्या वतीने पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहे.


या स्पर्धेसाठी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रबंधक बप्पासाहेब पिंपळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. संदीप बनसोडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांच्यासह प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

*फोटो आणि संबंधित बातमी*







संघर्ष योध्दा

गेवराई

## अट्टल महाविद्यालयात भित्तीपत्रक आणि सेल्फी विथ स्लोगन स्पर्धेला उदंड प्रतिसाद

By Amol Kapse

MAR 31, 2022



अट्टल महाविद्यालयात भित्तीपत्रक आणि सेल्फी विथ स्लोगन स्पर्धेला उदंड प्रतिसाद

गेवराई, दि. ३१ (प्रतिनिधी) मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, गेवराई, जि. बीड येथे India @75 अंतर्गत रक्तदान, क्षयरोग जागृती भित्तीपत्रक आणि सेल्फी विथ स्लोगन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. रजनी शिखरे उपजिल्हा रुग्णालय, गेवराई येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ.महादेव चिंचोले व जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी साधना गंगावणे यांच्या मार्गदर्शनाखाली व समुपदेशक राजश्री हिवरेकर उपजिल्हा रुग्णालय, गेवराई यांच्या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत रेड रिबन क्लबच्या वतीने HIV/AIDS जनजागृती करिता १) स्वेच्छा रक्तदान या विषयावर पोस्टर स्पर्धा, २) एचआयव्ही /टीबी जनजागृती यासंदर्भात शॉर्ट व्हिडिओ फिल्म तयार करणे, ३) स्वेच्छा रक्तदान या विषयावर शॉर्ट व्हिडिओ फिल्म तयार करणे आणि ४) सेल्फी विथ स्लोगन (फोटो) स्पर्धा या चार प्रकारातील स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेसाठी कार्यक्रमाधिकारी डॉ.समाधान इंगळे, डॉ. राहुल माने, प्रा.शरद सदाफुले यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

यापैकी भित्तीपत्रक स्पर्धेत १) प्रथम पारितोषिक – मानसी ज्ञानेश्वर दिसागज (बी.एस्सी. प्रथम वर्ष), २) द्वितीय पारितोषिक – लाड दिपाली शेषराव आणि पाठक आरती प्रमोद (बी.एस्सी. द्वितीय वर्ष) यांना विभागून देण्यात आले, तर ३) तृतीय पारितोषिक- काकडे कोमल एकनाथ (बी.एस्सी. प्रथम वर्ष) या विद्यार्थिनीने पटकाविले.

सेल्फी विथ स्लोगन या स्पर्धेत १) प्रथम पारितोषिक – दुरांडे विक्रम भागवत (बी.ए. तृतीय वर्ष), २) द्वितीय पारितोषिक – बाबरे लक्ष्मण अजिनाथ (बी.एस्सी. प्रथम वर्ष) आणि ३) तृतीय पारितोषिक सुळ सोमेश्वर रंगनाथ (बी.एस्सी प्रथम वर्ष) या विद्यार्थ्याने पटकाविले.

विजेत्या स्पर्धकांना जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी, बीड यांच्या वतीने पारितोषिके प्रदान करण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, डॉ. प्रशांत पांगरीकर, प्रबंधक बप्पासाहेब पिंपळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. संदीप बनसोडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. वृषाली गव्हाणे यांच्यासह प्राध्यापक कर्मचारी आणि विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भटक्या जनावरांसाठी पाणवठ्यांचे नियोजन

30 मार्च २०२२

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे यांच्या संकल्पनेतून आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या माध्यमातून गेवराई शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी भटक्या जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी एप्रिल २०२१ च्या उन्हाळ्यात विविध ठिकाणी ६ पाणवठे तयार करण्यात आले. हे पाणवठे ज्या नागरिकांच्या घराच्या जवळ आहेत त्यांनी त्यात नियमित पाणी भरून ठेवण्याचे आश्वासन दिले. अशा पाणवठ्यांवर शहरातील भटकी जनावरे, गाई - वासरे - कुत्री पाणी पितात. यामुळे उन्हाच्या काहिलीपासून जनावरांना दिलासा मिळतो. एरवी या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने त्यातील अनेक जनावरे दगावली होती. मात्र आता तहान लागल्यानंतर ही जनावरे पाणवठे बसवलेल्या ठिकाणी येऊन आपली तहान भागवतात. हे चित्र अतिशय समाधानकारक असल्याचे गेवराई येथील नागरिक सांगतात. महाविद्यालयाने स्वखर्चातून उभारलेल्या या पानवठ्यांमुळे भटक्या जनावरांच्या पाण्याचा प्रश्न सुटला आहे.

## फोटो



















PRINCIPAL
R.B.Attal College
Georai Dist.Beed